# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.04.2025** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या,**

1. मराठवाड्याला हक्काचं पाणी मिळवून देण्याची मुख्यमंत्र्यांची बीडमध्ये ग्वाही
2. अहिल्यानगरमधून सागरीमार्गे 14 टन डाळिंबांची अमेरिकेला निर्यात
3. राज्यातल्या साखर उत्पादनात गेल्यावर्षीच्या तुलनेत घट
4. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे न्यायव्यवस्थेतील मानवी सहभागामध्ये घट होणार नसल्याचं केंद्रीय कायदा राज्यमंत्र्याचं प्रतिपादन

   आणि

5. विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे, वीजांसह पावसाचा इशारा

**मराठवाडा**

मराठवाड्यातील जनतेला त्यांच्या हक्काचं पाणी मिळवून देण्याचं काम सरकार करुन देईल. पुढील पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही हा आपल्या सरकारचा संकल्प आहे अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना दिली. समुद्रात वाहून जाणारं 53 टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्याच्या योजनेला मान्यता दिली आहे, आता त्याचे आराखडे तयार होत आहेत. या वर्षाच्या शेवटी किंवा पुढच्या वर्षात हे काम सुरू केलं जाईल. कृष्णा कोयनेला येणाऱ्या पुराचं पाणीही जागतिक बँकेच्या माध्यमातून मराठवाड्यात आणण्याची योजना असून पुढील महिन्यात या कामाची निविदा निघेल अशी घोषणा फडणवीस यांनी केली.

**डाळिंब निर्यात**

अहिल्यानगरमधून 14 टन डाळिंबांची सागरी मार्गाने अमेरिकेत न्यूयॉर्क इथं निर्यात करण्यात आली. अपेडा म्हणजे कृषी आणि प्रक्रियाकृत खाद्यान्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून भारतीय डाळिंबाची पहिली व्यावसायिक सागरी खेप महाराष्ट्रातून रवाना झाली होती, ती पाच आठवड्यांनी न्यूयॉर्क इथं पोहोचली आहे. भारतीय डाळिंब जागतिक बाजारपेठेत पोहोचवण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारच्या वतीनं हा उपक्रम राबवला जात असून, त्या अंतर्गत भगवा या जातीच्या डाळिंबाची खेप पाठविण्यात आली.

**साखर उत्पादन घट**

यंदा राज्यात 80 लाख टन साखरेचं उत्पादन झालं आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ते 30 लाख टनांनी घटलं असून साखर उताऱ्यातही पाऊण टक्क्याची घट झाली आहे. यंदा 9 पूर्णांक 48 शतांश टक्के सरासरी साखर उतारा मिळाला आहे. गेल्या वर्षी 1073 लाख टन उसाच्या गाळपातून 110 लाख टन साखर उत्पादन आणि सरासरी 10 पूर्णांक 25 शतांश टक्के उतारा मिळाला होता. सर्वाधिक 22 लाख 46 हजार टन साखर उत्पादन कोल्हापूर

विभागात झालं आहे. राज्यात गेल्या वर्षीच्या साखर हंगामात 207 कारखान्यांनी गाळप हंगाम सुरू केला होता. त्या तुलनेत यंदा सात कारखान्यांची घट झाली आहे.

**मेघवाल पुणे**

न्यायव्यवस्थेतील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढला तरीही त्यातील मानवी सहभाग घटणार नाही असा विश्वास केंद्रीय कायदा राज्य मंत्री अर्जून मेघवाल यांनी काल पुण्यात व्यक्त केला. पुणे बार असोसिएशन आणि खासगी माध्यम समूहाच्या वतीनं -न्यायक्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता- या विषयावर आयोजित परिषदेत मेघवाल बोलत होते. केंद्रीय विमान वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष हेमंत झंझाड तसंच इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. न्यायव्यवस्थेतील कृत्रिम बुद्धिमत्ता वापराबाबत बोलताना मेघवाल म्हणाले.

**जब हमारे बॉडी माइंड इंटलेक्चुअल सोल चारो मिल जायेंगे वो जो काम करेंगे वो आर्टफ़िशिअल इंटलेजन्स नाही करेगा ध्यान रखना आपकी कोई बेरोजगारी हो जायेगी आपको काम नही मिलेगा ऐसा नही है आपको आर्टफ़िशिअल इंटलेजन्स युज कैसे करना ये सिस्टीम आपको ध्यान मै आणा चाहिये .**

पुण्याला उच्च न्यायालयाचं खंडपीठ मिळण्यासाठी ई-कोर्ट प्रकल्पाअंतर्गत दूरस्थ खंडपीठाचा प्रस्ताव पाठवला जाईल असं सांगून नोटरी संदर्भातील रखडलेल्या विषयांवर पंधरा दिवसांत निर्णय घेतला जाईल असं आश्वासन मेघवाल यांनी दिलं. वकिलांना वैद्यकीय विमा देण्याबाबत काम प्रगतीपथावर असून ते 80 टक्के पूर्ण झालं आहे. तसंच वकील सुरक्षितता कायद्याबाबत सकारात्मक विचार करून निर्णय घेतला जाणार असल्याचंही मेघवाल यावेळी बोलताना म्हणाले.

**अजित पवार एआय**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्वच क्षेत्रांत वाढू लागला असून राज्य सरकारनंही विविध विभागांमध्ये त्याचा अंतर्भाव केला आहे. शेतकऱ्यांनी कमी पाणी आणि कमी उत्पादन खर्चात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्यासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ऊस, कांदा, सोयाबीन, कापूस यासह फळबागांची लागवड करावी अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल सातारा जिल्ह्यात कोरेगाव इथं केली. एका शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते.

**युनेस्को गीता**

युनेस्को मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये म्हणजेच जागतिक महत्त्वाच्या आणि उत्कृष्ट वैश्विक मूल्ये असलेल्या वारसा नोंदींमध्ये आता श्रीमद् भगवद्गीता आणि भरत मुनींच्या नाट्यशास्त्राचा समावेश करण्यात आला आहे. यातील पाच हस्तलिखितं पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातील आहेत. संस्थेत कार्यरत निबंधक आणि अभिरक्षक श्रीरंग बापट यांनी आकाशवाणीला याबाबत माहिती दिली...

**आपल्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट अशी की भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरातल्या या ग्रंथाच्या सहा पोथ्या म्हणजे भगवत गीतेच्या पाच पोथ्या ज्या काश्मीर मधल्या आहेत म्हणजे आणि शारदा लीपी मध्ये लिहिल्या गेल्या आहेत त्या आणि भरत मुनीच्या नाट्य शास्त्राची देवनागरी लिपीतील पोथी जी आपल्याकडे राजस्थानातून आलेली आहे अशा पाच आणि एक सहा पोथ्यांमधून असलेल्या या दोन ग्रंथांना युनेस्को मेमोरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर मध्ये स्थान मिळालेले आहे. यापूर्वी ऋग्वेद त्याच्या नंतर पंचतंत्र या ग्रंथाना याच्या मध्ये स्थान मिळाले होते. आणि महत्वाची सांगायची गोष्ट म्हणजे भारतातर्फे ज्या एकूण 14 नोंदी या**

**एकूण या रजिस्टर मध्ये नोंदी झालेल्या आहेत. त्या पैकी पाच नोंदींचे ग्रंथ हे भांडारकर इन्स्टिट्यूट मध्ये आहेत. आणि अत्यंत अभिमानाची गोष्ट आपल्या साठी आहे.**

**मालगुंड-पुस्तकांचं गाव**
रत्नागिरी जिल्ह्यातल्या मालगुंड इथं आज 'पुस्तकांचं गाव' या उपक्रमाचा आरंभ होत आहे. कोकणातल्या साहित्यिकांची माहिती देणाऱ्या कोकणसाहित्य सन्मान दालनाचं उद्घाटनही यावेळी होणार आहे. याविषयी अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...
**'एक तुतारी द्या मज आणुनी' असं म्हणून मराठी कवितेत नवे प्राण फुंकणारे कवी म्हणजे केशवसुत अर्थात कृष्णाजी केशव दामले. रत्नागिरी जिल्ह्यातलं मालगुंड हे त्यांचं गाव म्हणजे आधुनिक कवितेची राजधानी असल्याचे उद्गार कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी काढले होते. आता 'पुस्तकांचं गाव' ही नवी ओळख या कवितेच्या राजधानीला मिळणार आहे. 20 एप्रिलला मालगुंडच्या कवी केशवसुत स्मारकात या उपक्रमाचं उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे मराठी भाषामंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. मधू मंगेश कर्णिक यांच्यासह अनेक मान्यवर त्या वेळी उपस्थित राहणार आहेतया उपक्रमात मालगुंडमधल्या 30, तर जवळच्या गणपतीपुळे गावातल्या पाच घरांचा समावेश करण्यात आला आहे. या घरांमध्ये प्रत्येकी सुमारे 250 ते 300 पुस्तकं ठेवली जाणार असल्याची माहिती 'कोमसाप'च्या अध्यक्षा नमिता कीर यांनी दिली. पर्यटकांना दिवसभर वाचनाचा आनंद घेता येणार असून, त्यांच्या आदरातिथ्यातून संबंधित कुटुंबांच्या अर्थार्जनालाही हातभार लागणार आहे. एकंदरीतच या उपक्रमामुळे वाचनसंस्कृती बहरण्यास आणि पर्यटन वाढण्यास मदत होणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**धान घोटाळा**
गडचिरोली जिल्ह्यात कुरखेडा तालुक्यातील देऊळगावमधल्या आदिवासी विविध कार्यकारी संस्थेच्या धानखरेदी केंद्रात उघडकीस आलेल्या धान अपहार प्रकरणी पोलिसांनी दोन जणांना अटक केली असून इतर 17 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. साठा पुस्तक आणि प्रत्यक्ष शिल्लक धान यामध्ये प्रथमदर्शनी तफावत आढळल्यानं शिल्लक धानाची मोजणी करण्यात आली त्यावेळी हा अपहार उघड झाला होता.

**पुणे भूमी अभिलेख घोटाळा**
जमीन मोजणी आणि हद्द निश्चितीच्या कामासाठी पन्नास लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपाखाली पुणे जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाच्याच दोन अधिकाऱ्यांच्या विरोधात पुणे शहरातील आर्थिक आणि सायबर गुन्हे शाखेनं गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी तक्रारदारानं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लेखी तक्रार केली होती, त्यानंतर तातडीनं दखल घेऊन प्रशासनानं ही कारवाई केली आहे.

**बालगृह, वसतिगृह**
राज्यातील काही भागांमध्ये बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या बालगृह, वसतिगृह आणि अनाथाश्रमांविरोधात एक वर्ष कारावास अथवा एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षांची कारवाई केली जाणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी दिली आहे. अनधिकृतपणे संस्थांमध्ये बालकांना डांबून ठेवणं, तसंच त्यांचं शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषण होत असल्याच्या घटना घडत असल्याचं निदर्शनास आलं आहे. कायद्यानुसार कोणत्याही संस्थेला नोंदणी प्रमाणपत्राशिवाय बालकांची देखभाल करण्याची परवानगी नाही. अशा संस्थांचं संचालन करणाऱ्यांवर एक वर्षाचा कारावास किंवा किमान एक लाख रुपयांचा दंड, किंवा दोन्ही शिक्षांची

तरतूद आहे, असं आयुक्त गुंडे यांनी सांगितलं. नागरिकांनी सतर्क राहून आपल्या परिसरात अशी अनधिकृत बालक संस्था आढळल्यास जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी अथवा चाईल्ड हेल्पलाईन 1-0-9-8 या क्रमांकावर तातडीनं संपर्क साधावा, असं आवाहन त्यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

**आयपीएल निकाल**

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये अहमदाबाद इथं काल गुजरात टायटन्सनं दिल्ली कॅपिटल्स संघाचा 7 गडी राखून पराभव केला. दिल्लीनं प्रथम फलंदाजी करताना 20 षटकांत 203 धावा केल्या. गुजरातनं 19 षटकांत 204 धावा करत विजयी लक्ष्य गाठलं. जयपूर इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात, लखनौ सुपर जायंट्सनं राजस्थान रॉयल्सला दोन धावांनी हरवलं. विजयासाठी 181 धावांचं लक्ष्य गाठताना राजस्थान रॉयल्स निर्धारित षटकांत पाच गडी बाद 178 धावाच करु शकला.

**हवामान**

राज्यात सध्या सगळीकडेच कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान असेल. कोकण आणि मराठवाड्यात कोरडं हवामान राहील तर विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे, वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.